सोबत सामान्य प्रशासन विभागाचे "फौजदारी प्रकरणातील न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात सूचना" या विषयाचे परिपत्रक क्र.वशिअ-१३१५/प्र.क्र.२७/११, दिनांक १४/९/२०१५ ची प्रत सोबत जोडत आहे.

---

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१५/शा१९३
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक :
9 DEC 2015

प्रति,

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर
२) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व संस्था / कार्यालये प्रमुखांच्या निदर्शनास आणावे व पुढील कार्यवाही करावी.

( डॉ. अ.तु. पिसे )
उपसंचालक, तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

6670 14/12/15

प्रत :- कार्यासन क्रमांक ४, ४अ, ५ व १२ मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

क्रमांक :- विकाअ/आस्था/के.७/2015/3173
दिनांक :- 16 DEC 2015

प्रति,
प्राचार्य, शासकीय अभि. महा. अमरावती / श्री. श्री. गो. महा. शेगांव
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती / यवतमाळ / वाशिम / मुर्तिजापूर / खामगाव
प्राचार्य, शा. निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.

सहसंचालक
तंत्र शिक्षण, अमरावती

प्रत :- सिस्टम, तंत्रशिक्षण वि.का. अम.

फौजदारी प्रकरणातील न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात सूचना

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक, क्रमांक : वशिअ -१३१५/प्र.क्र.२७/११,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १४ सप्टेंबर, २०१५

परिपत्रक

शासकीय कर्मचाऱ्याच्या वर्तनामुळे त्याच्यावर फौजदारी गुन्ह्याचा आरोप ठेवण्यात येऊन त्यात तो दोषी ठरला असेल व त्याला कोणतीही शिक्षा देय झाली असेल तर अशा प्रकरणी त्या कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम १३ (एक) च्या तरतुदीन्वये कोणतीही चौकशी न करता शिक्षा देता येते. अशी शिक्षा देण्यापूर्वी त्यास शिक्षेबाबत अभिवेदन करण्याची संधी दिली जाऊ शकेल असेही त्या नियमाखालील परंतुकात स्पष्ट करण्यात आले आहे.

२. फौजदारी आरोपाखाली दोषी ठरलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रकरणात कशी कार्यवाही करावी याबाबतचे विवेचन विभागीय चौकशी नियमपुस्तिका, १९९१ च्या परिच्छेद- ४.६ मध्ये नमूद केले आहे. त्यानुसार, फौजदारी गुन्ह्यासाठी कर्मचारी न्यायालयात दोषी ठरला असेल तर त्याने अपील करण्याची मुदत संपेपर्यंत वाट न पाहता अथवा अपील केले असेल तर पहिल्या अपील न्यायालयाच्या निर्णयाची वाट न पाहता त्याला शिक्षा करता येते. अशा प्रकरणी समुचित शिक्षा देताना कोणत्या बाबी विचारात घ्याव्यात याबाबतचे मार्गदर्शन त्या परिच्छेदात करण्यात आले आहे.

३. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, नियमात/ नियमपुस्तिकेमध्ये वरीलप्रमाणे स्पष्ट तरतूद विहित केली असूनसुद्धा न्यायालयाने अपराधसिद्धी व शिक्षेसंबंधीचा न्यायनिर्णय दिल्यानंतरही वरील तरतुदींनुसार कर्मचाऱ्याच्या सेवासमाप्तीसंबंधी/ समुचित शिक्षा देण्यासंबंधीची कार्यवाही तातडीने केली जात नाही. तसेच कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या शिक्षादेशाविरुद्ध अपील न्यायालयात केलेल्या अपीलावरील अंतरिम आदेश विचारात घेऊन गैरवर्तणुकीसाठी शिक्षा देण्याची कार्यवाही प्रलंबित ठेवण्यात येते.

४. यासंदर्भात सर्व विभागांना आणि क्षेत्रिय कार्यालयांना आता पुनश्च पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:

अ) फौजदारी प्रकरणातील कर्मचाऱ्याशी संबंधित कार्यालयाने प्रत्येक सुनावणीच्या तारखेस न्यायालयात झालेल्या कार्यवाहीची माहिती घ्यावी व शासकीय वकिलांच्या संपर्कात राहून सुनावणीअंती न्यायालयाचे शिक्षादेश तात्काळ प्राप्त करुन घ्यावेत. सदर आदेशांची प्रत प्राप्त झाल्यावर, संबंधित कर्मचाऱ्याने अपील करण्याची मुदत संपण्याची अथवा अपील दाखल केले असल्यास अपील न्यायालयाच्या निर्णयाची वाट न पाहता, कनिष्ठ न्यायालयातील अपराधसिद्धी

विचारात घेऊन कर्मचाऱ्याच्या गैरवर्तनाच्या अनुषंगाने नियम १३ (एक) अनुसार त्यास शिक्षा देण्याची पुढील कार्यवाही करण्यासाठी प्रकरण तातडीने सक्षम प्राधिकाऱ्यास सादर करावे. सक्षम प्राधिकाऱ्यांनी शिक्षेचे आदेश विनाविलंब निर्गमित केले जातील याबाबत दक्षता घ्यावी. या कार्यवाहीत दिरंगाई झाल्यास त्याबाबतची जबाबदारी निश्चित करुन अशी दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ मधील तरतुदींचा भंग केल्याप्रकरणी न्यायालयात अपराध सिद्ध झाला असल्यास अशा प्रकरणी सक्षम प्राधिकाऱ्याच्या शिक्षादेशाची प्रत तातडीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागासही उपलब्ध करुन द्यावी.

ब) वरीलप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यापूर्वीच अपील न्यायालयाचे अंतरिम आदेश प्राप्त झाल्यास आणि त्या आदेशात अपील न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या शिक्षेच्या केवळ अंमलबजावणीस (execution of sentence) स्थगिती दिली असेल तर अपील न्यायालयाच्या अंतिम आदेशासाठी वाट न पाहता कनिष्ठ न्यायालयातील अपराधसिद्धी विचारात घेऊन गैरवर्तनासाठी वरील सेवारत कर्मचाऱ्यास नियम १३ (एक) अन्वये शिक्षा देण्याची कार्यवाही विनाविलंब पूर्ण करण्यात यावी. तसेच संबंधित कर्मचारी सेवानिवृत्त झाला असल्यास त्याला महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या नियम २७ खालील तरतुदीत नमूद केल्यानुसार शिक्षा देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

क) परंतु, अपील न्यायालयाने त्यांच्या अंतरिम आदेशात कनिष्ठ न्यायालयातील अपराधसिद्धीस (conviction) स्थगिती दिली असेल तर मूळात अपराधसिद्धी स्थगित होत असल्याने कनिष्ठ न्यायालयाच्या शिक्षादेशाच्या आधारे गैरवर्तनासाठी शिक्षा देण्याची कार्यवाही प्रलंबित ठेवावी व अपीलाचा अंतिम निर्णय लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी पाठपुरावा करावा. अपील न्यायालयाचा निर्णय प्राप्त झाल्यावर त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

५. हे परिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१५०९१४१६२८४४१८०७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhagwan Sahai

Digitally signed by Bhagwan Sahai
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhagwan Sahai
Date: 2015.09.14 17:33:32 +05'30'

(डॉ.भगवान सहाय)
अपर मुख्य सचिव (सेवा)

प्रति,

१. राज्यपालांचे सचिव,